भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३१० / माहिती कक्ष / वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा

दिनांक ०४/०५/२०१७

१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २/०५/२०१७ चे ११.३० दि. ३/०५/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी शेतामध्ये शेळया चारीत असतांनी यातील आरोपी हा फिर्यादीचे जवळ जावुन काही वेळ थांबुन फिर्यादीचे मागे येवुन तीचा विनयभंग करून तिला बिलगला तेव्हा फिर्यादीने तीच्या हातातील काठीने आरोपीचे पायावर मारले तु माझ्या अंगाला का बिलगला असे हटकल्याने आरोपी हा तेथुन निघुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४,(अ),(१) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि निबेंकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

२) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या महिलेस धडक मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/०५/२०१७ चे १०.५० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. अंजनाबाई रावजी मेश्राम वय ५५ वर्ष, रा. पिंपळगाव ही तंबाखुची पुडी घेवुन घरासमोर आली असता दहेगांव रोडाकडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस मागेहुन धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

३) क्षुल्लक कारणावरून भांडण शिवीगाळ, बाबुंच्या काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद,:–

दिनांक ०२/०५/२०१७ चे १९.०० वा दरम्यान यातील आरोपीने दारू पिऊन खुल्या छपरीत येवुन फिर्यादीस आमच्या घरी तुला जेवनाचा अधिकार नाही. असे म्हणुन जेवनाच्या ताटावर बसला असता लाथाबुक्यांने मारहान केली व घरातुन बाहेर काढुन बाबुंच्या काठीने फिर्यादीचे उजव्या हाताच्या मनगटावर व डाव्या बाजुस डोक्यावर मारपीट करून तसेच शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी हेतराम जयपाल पारधी वय ६५ वर्ष, रा. खांबाजाभंळी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

४) मोटार सायकल चालक हा दारूचे नशेत आपले अस्तीत्व लपवुन निष्काळजीपणे वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/०५/२०१७ चे ००.३० वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १ व २ हे आपले मोटार सायकल क्र. एमएच. ४९/एच १२९१ नी नागपुर कडुन भंडारा कडे एनएच. ०६ रोडने तोंडास कापड बांधुन व आपले अस्तीत्व लपवुन जात असतांनी ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे व दारूचे नशेत भरधाव वेगाने चालवितांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि पाटील यांचे रिपोर्ट वरून पोस्टे. जवाहरनगर येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८४,१८५ मोवाका. सहकलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) अज्ञात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकाला धडक मारून जखमी केल्याने व सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/०५/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी शामराव महादेव कुलरकर वय ६५ वर्ष रा. १३५५ देशपांडे ले आऊट वर्धमान नगर, नागपुर याचा भाऊ जखमी राधेशाम महादेव कुलरकर हा आपले प्लेंझर गाडी क्र. एमएच. ३६ व्ही. ८६३२ ने डोगरगाव कडुन भंडाराकडे येत असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक मारून फिर्यादीचे भावास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) अवैध दारु अड्डयावर धाडी . :–

दिनांक ०३/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, व तुमसर येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६२ लिटर हा.भ.दारू किंमती ६,२००/–रु, असा एकुण किंमती ६,२००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०३/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ७४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PSF
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.